

त्रिमुर्ती शिक्षण संस्थेचे,

# श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै. डॉ. भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय,

साक्री, ता. साक्री जि. धुळे

नॅक प्रमाणित

फोन व फॅक्स नं. : ०२५६८–२४०४६२

Email Id : vimalbaipatil@yahoo.co.in

web - www.vupabsdscsakri.com

नॅक प्रमाणित

# माहिती पुस्तीका

२०१८–२०१९



## महाविद्यालयाची यशोगाथा/वाटचाल

| | | |
|---|---|---|
| महाविद्यालय स्थापना | : | १९ ऑगस्ट १९९८ |
| महाविद्यालय मान्यता | : | महाराष्ट्र शासन जा.क्र.एनजीसी-२५९८/नमवि/ (०१/९८) मशि-३ उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२. दि. १९ ऑगस्ट १९९८. |
| कॉलेज कोड नं. | : | २१००७६ |
| कॉलेज सेंटर कोड नं. | : | २१०५ |
| युजीसी | : | २ (एफ) दि. २ सप्टेंबर २००९, १२ (बी) दि. १२ जानेवारी २०११. |
| विद्याशाखा | : | कला व विज्ञान, एम. ए. इतिहास. विद्यापीठ १८१ अंतर्गत परिवहन व पर्यटन व्यवस्थापन प्रमाणपत्र व पदविका अभ्यासक्रम |
| य.च.म.मु.वि.नाशिक | : | बी.ए. व एम.ए. (मराठी, हिंदी) प्रवेश मिळेल. |
| एकुण विभाग | : | २१ |
| उच्च विद्याविभुषित शिक्षक | : | शिक्षक-३१, पीएच.डी.०५, एम.फिल-१६, सेट-नेट-०४ |
| शिक्षकेतर कर्मचारी | : | ०८ |
| जिमखाना विभाग | : | राष्टीय व आंतरराष्ट्रीय खेळांची सुविधा |
| ग्रंथालय | : | ग्रंथसंख्या-५९६८, मुल्य-७,३५,११५ रुपये. |
| राष्ट्रीय सेवा योजना | : | नियमित कार्यक्रम-१५० विद्यार्थी, विशेष श्रमसंस्कार शिबीर-७५ विद्यार्थी |
| आदिवासी विद्यार्थ्यांसाठी | : | एकलव्य प्रशिक्षण केंद्र |
| चाणक्य स्पर्धा परिक्षा केंद्र | : | स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र |
| आजीवन शिक्षण कक्ष | : | युवती सभा |
| अंतर्गत दर्जा सुधार कक्ष | : | (Internal Quality Assurance Cell) |

विद्यार्थी समुह विमा योजना व कर्म. भाऊराव पाटील कमवा व शिका योजना.
विद्यार्थी व्यक्तीमत्त्वासाठी विविध मंडळाव्दारे कार्यक्रमांचे आयोजन.





### सुस्वागतम्....

**महाविद्यालयातील प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थी-विद्यार्थीनींचे हार्दिक स्वागत!**

दुरीतांचे तिमीर जावो| विश्व स्वधर्म सूर्य पाहो| हे ब्रिद वाक्य सत्यात आणणाऱ्या कै. डॉ. बाबासाहेब भास्कर सदाशिव देसले यांनी स्थापन केलेल्या त्रिमुर्ती शिक्षण संस्थेच्या विद्यमान अध्यक्ष मा. श्रीमती मृणाल भास्कर देसले व सचिव श्रीमती. डॉ. मंगलाताई भास्कर देसले यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाची यशस्वी वाटचाल सुरू आहे.

कला शाखेत पदवी व पदव्युत्तर आणि विज्ञान शाखेत पदवीपर्यंत शिक्षणाची महाविद्यालयात सोय आहे. या वर्गांची प्रवेशप्रक्रीया सूरू आहे. महाविद्यालयात प्रवेश घेण्यापुर्वी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे माहितीपत्रक पुर्णपणे वाचावे व प्रवेश अर्ज करावा. प्रवेश आरक्षण व पात्रता परिक्षा याबाबत उ.म.वि.जळगाव व महाराष्ट्र शासन यांचे नियम पाळले जातात. महाविद्यालयात शिकविल्या जाणाऱ्या विषयांची वर्षनिहाय सूची व गट तसेच फी संबंधीचा तक्ता पुढे दिलेलाआहे. फी संदर्भात महाराष्ट्र शासन व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव वेळोवेळी जे बदल करतील ते विद्यार्थ्यांस बंधनकारक राहतील.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून य.च.म.मु.वि.नाशिक यांनी बी.ए. व एम.ए.(मराठी व हिंदी) विषयांसाठी नविन अभ्यासक्रम केंद्रास मान्यता दिली आहे. वर्षभर नियमित अभ्यास व अभ्यासत्तर कार्यक्रम आयोजित करून विद्यार्थ्यांना सर्वांगिन विकास होण्याच्या दृष्ट्रीने महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी प्रयत्नशिल असतात त्यात विद्यार्थ्यांनी सक्रीय सहभाग द्यावा तसेच महाविद्यालयाच्या नियमांचे व शिस्तीचे पालन करून यशस्वी व सुजाण नागरीक घडावा ही हार्दिक शुभेच्छा!



प्राचार्य
त्रि.शि.स.चे श्रीमती वि.उ.पाटील कला व
कै.डॉ.भा.स.देसले विज्ञान महाविद्यालय
साक्री, ता साक्री, जि.धुळे

प्राचार्य डॉ. पी. एस. सोनवणे

साक्री (धुळे)

२१ व्या शतकाला सामोरे जाण्यासाठी व आपली शैक्षणिक, वैचारीक, आर्थीक प्रगती सांधण्यासाठी कै. डॉ. बाबासाहेब भास्कर सदाशिव देसले यांनी दुरदृष्टी ठेवून त्रिमूर्ती शिक्षण संस्थेची मुहुर्तमेढ रोवली. आज आमच्या महाविद्यालयाचे विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेऊन विविध क्षेत्रात आपले कार्य व कर्तव्य सिध्द करीत आहेत.

आमचे महाविद्यालय उ.म.विद्यापीठ जळगांवशी संलग्नीत असून आमच्या महाविद्यालयात कला शाखेत पदवी व एम. ए. इतिहास विषयाचे पदव्युत्तर पर्यंत तर विज्ञान शाखेत संगणक, माहिती तंत्रज्ञान, रसायनशास्त्र, सुक्ष्मजिवशास्त्र, जैविक रसायन हे रोजगारभिमुख अभ्यासक्रम तसेच प्रवेशपात्रता अभ्यासक्रम, परिक्षा, शुल्क इ. बाबतीत उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगावच्या व महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार कार्यवाही करण्यात येते.

विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढी बरोबर विविध उपक्रम व कार्यक्रमांच्याव्दारे त्यांच्या व्यक्तीमत्त्वाचे सर्वांगीण जडण-घडण सर्व समक्ष आदर्श नागरीक घडवून लोकशाही जीवनमुल्य विद्यार्थ्यांत रूजविण्याचा प्रयत्न व त्यास विज्ञाननिष्ठ करून २१ व्या शतकाला सामोरे जाण्यासाठी सुशिक्षीत, आदर्शमुल्य जपणारा एक सुजाण युवक घडविणे हेच महाविद्यालयाचे ध्येय आहे.

**संस्थेची वैशिष्ट्ये :-** महाविद्यालयाच्या स्थापनेनंतर संस्थेने स्वतःची भव्य वास्तु प्रशस्त जागेत सूरत नागपूर महामार्गालगत, निसर्गरम्य अशा वातावरणात उभी केली आहे. या वास्तूत प्रशासन विभाग, प्राचार्य दालन, प्राध्यापक दालन, महिला दालन तसेच संगणक, माहिती व तंत्रज्ञान, रसायनशास्त्र, सुक्ष्मजीवशास्त्र, जैविक रसायण, इलेक्ट्रॉनिक, भुगोल, भौतिकशास्त्र यांच्या स्वतंत्र्य प्रयोगशाळा, ग्रंथालय, वाचनकक्ष, उपहारगृह इ. सोयींनी परिपूर्ण आहे.

**ग्रंथालय :-** विद्यार्थ्यांची बौध्दीक, वैचारीक, सांस्कृतीक पातळी उंचावण्याच्या दृष्टीकोणातून आमच्या ग्रंथालयात क्रमीक पुस्तके, संदर्भग्रंथ, मासिके, नियतकालिके, मराठी, हिंदी, इंग्रजी या विविध भाषेत उपलब्ध करूण देण्यात आलेली आहेत.

**१) पुस्तक देवाण-घेवाण योजना :-** महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांस ग्रंथालय कार्ड दिले जाते. या कार्डावर घरी अभ्यासनासाठी पुस्तके दिली जातात. ती आठवड्यातून दोन वेळा बदलून दिली जातात. त्याचप्रमाणे ओळखपत्रावर देखिल ग्रंथालयात वाचन कक्षात पुस्तके दिली जातात.



**२) अभ्यासिका :-** महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालयात स्वतंत्र्य अभ्यासिका दालन आहे. अभ्यासिकेची वेळ सकाळी ८.३० ते ४.३० पर्यंत आहे.

**३) संगणक :-** ग्रंथालयात स्वतंत्र्य संगणक असून तेथे इंटरनेटची व्यवस्था करण्यात आली आहे.

**४) अभ्यासक्रम व प्रश्नसंच :-** उत्तर महाराष्ट्र विद्यापिठाचे सर्व वर्गाचे अभ्यासक्रम ग्रंथालयात प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी उपलब्ध करून दिले जाते. विद्यापिठामार्फत घेतल्या गेलेल्या मागील वर्षांचे प्रश्नसंच सर्वांना उपलब्ध करून दिले जाते.

**विविध मंडळे :-** विद्यार्थ्यांच्या सर्वागीण व्यक्तीमत्त्वाचा विकास साधण्यासाठी विविध मंडळामार्फत कार्यक्रम योजिले जातात. नाट्य, निबंधलेखन, काव्यलेखन व अन्य माहितीवर लिखान त्यास करता यावे व त्याच्या वक्तृत्व कलेला उजाळा मिळावा म्हणून विविध मंडळामार्फत विविध कार्यक्रम आयोजित केले जातात.

**जिमखाना :-** जिमखाना विभागातर्फे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळ खेळले जातात व शिकविले जातात.

**राष्ट्रीय सेवा योजना :-** विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचे एकक कार्यरत आहे. विद्यार्थ्यांच्या मानसिक, बौध्दीक, शारीरीक विकासाबरोबर त्यात श्रमप्रतिष्ठा, सेवाभाव, सहजीवन इ. गुण विकसीत व्हावे म्हणून राष्ट्रीय सेवा योजने मार्फत विविध कार्यक्रम राबविले जातात. विद्यापिठामार्फत श्रमसंस्कार शिबीर, व विविध राष्ट्रीय, सामाजिक कार्यक्रम आयोजित केले जातात.

**चाणक्य स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र :-** २१ वे शतक हे स्पर्धेचे युग मानले जाते. पदवी घेतल्यानंतर विद्यार्थ्यास प्रशासकीय सेवेचा लाभ व्हावा यासाठी प्रशासनाने विविध स्पर्धा परीक्षा आयोजित केल्या आहेत. या स्पर्धा परिक्षांना सामोरे जाण्यासाठी ग्रामीण भागातील विद्यार्थी समर्थपणे उज्वल भविष्याकडे वाटचाल करण्यासाठी सक्षम व्हावा म्हणून उत्तर महाराष्ट्र विद्यापिठाने चाणक्य स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन सुरू केले. २०१०-२०११ पासून आमच्या महाविद्यालयात हे केंद्र सूरू केले आहे. विद्यार्थ्यांना तज्ञ, अनुभवी प्राध्यापक मार्गदर्शन करतात. केंद्रासाठी ग्रंथालयात व्यवस्था करण्यात आलेली आहे.

**महाविद्यालय प्रवेश नियमावली :-**

१) प्रथम वर्ष कला व विज्ञान अभ्यासक्रमाचे प्रवेश ३१ जुलैपर्यंत पुर्ण माहिती भरून व ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया पुर्ण करावी.

२) एकदा पात्रता झाल्यानंतर विद्यार्थ्यांना विषय बदलता येणार नाही.

महाविद्यालयातील सर्व विद्याअभ्यासक्रमांसाठी पदवी तसेच पदव्युत्तर (एम.ए.इतिहास) प्रवेश प्रक्रिया मा. न्यायालय, महाराष्ट्र शासन व विद्यापीठ यांनी ठरविलेल्या नियमानुसार राहिल. महाविद्यालयात प्रवेश घेण्यापुर्वी प्रत्येक विद्यार्थ्याने महाविद्यालयाचे माहिती पत्रक विकत घेऊन प्रवेश अर्ज करावा. प्रवेश घेतल्यानंतर विद्यापीठ नियमानुसार प्रत्येक विषयाची प्रत्येक सत्रात चाचणी परिक्षा घेतली जाईल. प्रवेश आरक्षणाबाबत महाराष्ट्रशासन व विद्यापिठाचे नियम पाळले जातील.

**प्रवेश घेतांना जोडावयाची कागदपत्रे :-**

१) प्रवेश अर्ज
२) १० वी १२ वी गुणपत्रक व त्यांच्या प्रत्येकी दोन छायांकीत (झेरॉक्स) प्रती
३) शाळा सोडल्याचा मुळ दाखला (LC/TC) व दोन छायांकीत (झेरॉक्स) प्रती
४) २ पासपोर्ट साईज फोटो
५) गॅप असल्यास गॅप सर्टीफिकेट
६) आधारकार्ड
७) मागासवर्गीय इतर मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र व उत्पन्नाचा दाखला.
८) स्थलांतर प्रमाणपत्र (मायग्रेशन सर्टिफिकेट) (१२ वी परिक्षा महाराष्ट्र बाहेरील बोर्डातून उर्तीर्ण केले असल्यास अथवा उत्तर महाराष्ट्र विद्यापीठा व्यतीरीक्त इतर कुठल्याही विद्यापिठाच्या अथवा बोर्डाच्या कुठल्याही अभ्यासक्रमास प्रवेशित असल्यास)

टिप. डुप्लीकेट एल.सी/टी.सी वर प्रवेश मिळणार नाही.

**विद्यार्थ्यांनी वर्षनिहाय अभ्यासावयाचे विषय :-**

**प्रथम वर्ष कला :** महाविद्यालयाच्या सोयीसाठी खालील विषयांचे गट करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी खालील गटातून एकूण ६ विषयांची निवड करावयाची आहे.

**१) गट (ए) इंग्रजी अनिवार्य**
२) गट (बी) (मराठी/हिंदी/वैकल्पिक इंग्रजी) यापैकी कमीत कमी १ व जास्तीत जास्त २
३) गट (सी) इतिहास / अर्थशास्त्र
भूगोल / /शिक्षणशास्त्र
राज्यशास्त्र / संरक्षणशास्त्र
समाजशास्त्र या पैकी कमीत कमी ३ व जास्तीत जास्त चार विषय निवडावीत.

श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै. डॉ. बी. एस. देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री

**विद्यार्थ्यांसाठी :-** स्काय-ब्ल्यु पँट व पिंक शर्ट

**विद्यार्थीनींसाठी :-** स्काय-ब्ल्यु सलवार किंवा पँट व पिंक टॉप, कुर्ता,शर्ट

**पर्यावरणशास्त्र :-** F.Y.B.A / F.Y.B.Sc वर्गासाठी पर्यावरणशास्त्र हा विषय सक्तीचा आहे. यासाठी स्वतंत्र्य १००/- रू. फी आहे. विद्यापिठाच्या नियमानुसार या विषयात पास झाल्याशिवाय पदवी मिळणार नाही.

**वैद्यकीय तपासणी :-** प्रथम वर्ष कला व विज्ञानाच्या प्रत्येक विद्यार्थ्यास विद्यापीठ नियमानुसार वैद्यकीय तपासणी करणे आवश्यक आहे. त्याशिवाय परिक्षेचा निकाल जाहीर केला जाणार नाही.

**व्दीतीय वर्ष कला : (S.Y.B.A)**

**(एकूण सहा विषय)**

१) इंग्रजी सक्तीचा (Compulsory)
२) प्रथम वर्ष बी.ए.च्या वर्गात अभ्यासलेल्या विषयांपैकी स्पेशल विषयाचे तिन पेपर (एस.१ एस.२ जनरल)
३) स्पेशल विषयाखेरीज इतर दोन विषयांचे प्रत्येकी एक पेपर (जनरल)
४) एस.वायच्या विद्यार्थ्याने जनरल नॉलेज (G.K) चा पेपर एस.वाय.बी.ए व बी.एस्सी.. यावर्गात अभ्यासणे अनिवार्य आहे.

**तृतीय वर्ष कला (T.Y.B.A) :-**

व्दितीय वर्ष कला (S.Y.B.A) वर्गात निवडलेल्या विषयांचे त्यांच्याप्रमाणे सहापेपर

१) विशेष (स्पेशल) विषयांना विद्यार्थी संख्या मर्यादीत असते.
२) भुगोल विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांना S.Y.B.A (S2) आणि T.Y.B.A (S4) या पेपरांना प्रत्येकी १०० गुणांची प्रात्येक्षिक परिक्षा असेल.

## विज्ञान शाखा अभ्यासक्रम

| Sr.No. | FYBSc | SYBSc | TYBSc |
|---|---|---|---|
| १ | कॉम्प्युटर | कॉम्प्युटर | कॉम्प्युटर |
| २ | आय.टी | आय.टी | आय.टी |
| ३ | मॅथमॅटीक्स | मॅथमॅटीक्स | केमेस्ट्री |
| ४ | फिजिक्स | फिजिक्स | मायक्रोबॉयोलॉजी |
| ५ | इलेक्ट्रॉनिक्स | इलेक्ट्रॉनिक्स | बायोकेमेस्ट्री |
| ६ | केमेस्ट्री | केमेस्ट्री | |
| ७ | झुलॉजी | झुलॉजी | |
| ८ | भुगोल | भुगोल | |
| ९ | मायक्रोबॉयोलॉजी | मायक्रोबॉयोलॉजी | |
| १० | बायोकेमेस्ट्री | बायोकेमेस्ट्री | |
| ११ | पर्यावरणशास्त्र (सक्तीचा) | मराठी किंवा इंग्रजी | |
| १२ | | जनरल नॉलेज सक्तीचा | |
| Note - | विद्यार्थी खालील पैकी चार विषयांचा कोणताही गृप घेऊ शकतात. | विद्यार्थी मराठी किंवा इंग्रजी आणि खालील पैकी तीन विषयांचा कोणताही एक गृप घेऊ शकतो. | विद्यार्थी खालीलपैकी कोणताही एक अनिवार्य विषय घेऊ शकतात. |
| १ | कॉम्प्युटर | कॉम्प्युटर | कॉम्प्युटर |
| २ | मॅथमॅटीक्स | मॅथमॅटीक्स | |
| ३ | फिजीक्स | फिजीक्स/इलेक्ट्रॉनिक्स | |
| ४ | इलेक्ट्रॉनिक्स | | |
| | | | |
| १ | आय.टी | आय.टी/आय.टी | आय/टी |
| २ | केमेस्ट्री | फिजीक्स | |
| ३ | फिजीक्स | फिजीक्स/इलेक्ट्रॉनिक्स | |
| ४ | इलेक्ट्रॉनिक्स | | |
| | | | |
| १ | मायक्रोबॉयोलॉजी | मायक्रोबॉयोलॉजी | मायक्रोबॉयोलॉजी |
| २ | केमेस्ट्री | केमेस्ट्री | |
| ३ | झुलॉजी | झुलॉजी | |
| ४ | भुगोल | | |
| | | | |
| १ | केमेस्ट्री | केमेस्ट्री | केमेस्ट्री |
| २ | फिजीक्स | झुलॉजी | |
| ३ | झुलॉजी | भुगोल | |
| ४ | भुगोल | | |
| Note - | प्रत्येक विषयासाठी ३ थेरी व प्रॅक्टीकल पेपर असतील | सर्व विषयांसाठी दोन थेअरी व एक प्रॅक्टीकल पेपर असतील | सहा थेअरी व तीन प्रॅक्टीकल असतील. |

**टिप :-** F.Y.B.Sc वर्गासाठी पर्यावरण (ENV.Studies)आणि S.Y.B.Sc वर्गासाठी जनरल नॉलेज (GK) हे दोन विषय अभ्यासावयाचे आहेत. या विषयात उत्तीर्ण झाल्याशिवाय पदवी मिळणार नाही.



**एम. ए. इतिहास :-** उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने एम. ए. इतिहास संलग्नीकरण दिले आहे. मा.न्यायालय महाराष्ट्र शासन व विद्यापीठ निर्णयानुसार प्रवेश प्रक्रीया पुर्ण केली जाईल हा अभ्यासक्रम दोन वर्षाचा असून प्रत्येक वर्गासाठी विद्यापीठ अभ्यासक्रमानुसार ४ पेपर शिकवीले जातील. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने एम.ए.साठी सन २०१६-१७ पासून सत्र परिक्षा (Semester Pattern) लागु केली आहे. ६०+४० पॅटर्न स्विकारला आहे. ६० गुणांची विद्यापीठामार्फत लेखी परिक्षा होईल व ४० गुण अंतर्गत मुल्यमापनासाठी आहेत. सत्रपुर्व परिक्षेस बसणे सक्तीचे राहील त्याशिवाय सत्र मंजूर होणार नाही. सत्र मंजूरी शिवाय परिक्षा फॉर्म भरता येणार नाही. अंतर्गत परिक्षेला अनुपस्थीत राहणाऱ्या विद्यार्थ्यांचे विद्यापीठ परिक्षेचे गुण ग्राह्य धरले जाणार नाहीत.

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक :-**

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून बी. ए. व एम. ए. (मराठी / हिंदी) या विषयांच्या अभ्यासक्रमांना प्रवेश मिळेल.

**फी भरणे संबंधी सुचना :-**

१) प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थ्याला नियमानुसार फि भरावी लागेल प्रवेश अर्ज पात्रता फॉर्म व परिक्षा फॉर्म स्वःता भरावा. फॉर्म मध्ये दिलेल्या माहितीस विद्यार्थी स्वतः जबाबदार राहिल.

२) महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर मध्येच विद्यार्थी महाविद्यालय सोडून गेल्यास त्याच्याकडून संपुर्ण सत्राची फी वसूल केली जाईल.

३) फी मुदतीच्या आत न भरल्यास नियमानुसार दंड आकारण्यात येईल.

४) फी संबधीचा तक्ता पहावा.

५) प्रवेश रद्द करणे संबधीची माहिती

६) महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर १५ दिवसाच्या आत प्रवेश रद्द केला तर ५० टक्के फी परत मिळेल, त्यानंतर जर विद्यार्थ्यांने प्रवेश रद्द केला तर विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार कोणतेही शुल्क परत मिळणार नाही.

**परिक्षा अर्ज भरावयाची कार्यपध्दती :-**

१) प्रथम वर्ष कला, विज्ञान विद्या शाखेतील प्रथमसत्राचे परिक्षा अर्ज दर शैक्षणिक वर्षात विद्यापीठाच्या सुचनेनुसार विनाविलंब शुल्कासह महाविद्यालयात स्विकारले जातील.

२) व्दितीय व तृतीय वर्ष कला, विज्ञान वर्गासाठी परिक्षा अर्ज भरण्यात वरील नियम लागु राहतील.

**विद्यापीठ परिक्षा गुण विभागणी व परिक्षेची कार्यपध्दती :-**

१) प्रत्येक सत्र पध्दतीत विद्यार्थ्यांसाठी लेखी परिक्षा सत्र ६० गुणांची राहील व अंतर्गत परिक्षा ४० गुणाची राहील. (सेमिनार / ट्युटोरीयल- १०, दोन टेस्ट- २० उपस्थिती-१०)

२) विद्यार्थ्यास विषय उर्तीर्ण होण्यासाठी बहिस्थ परिक्षेत ६० पैकी किमान २४ गुण प्राप्त करणे आवश्यक आहे तसेच अंतर्गत मुल्यमापनासाठी ४० गुण पैकी किमान १६ गुण मिळवणे आवश्यक आहे.

३) विद्यार्थ्यास तृतीय वर्षात प्रवेश मिळविण्यासाठी प्रथम वर्षाचे सर्व विषय उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

## फी संबधीचा तक्ता शैक्षणिक वर्ष २०१८-१९

| वर्ग | प्रथम वर्ष | व्दितीय वर्ष | तृतीय वर्ष | प्रथम वर्ष | व्दितीय वर्ष | तृतीय वर्ष | एम.ए |
|---|---|---|---|---|---|---|---|
| तपशिल | कला | कला | कला | विज्ञान | विज्ञान | विज्ञान | इतिहास |
| प्रवेश शुल्क | २५ | २५ | २५ | २५ | २५ | २५ | २५ |
| ग्रंथालय शुल्क | १२५ | १२५ | १२५ | १२५ | १२५ | १२५ | २५० |
| वैद्यकीय शुल्क | २५ | - | - | २५ | - | - | २५ |
| जिमखाना शुल्क | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० |
| अंतर्गत परिक्षा शुल्क | ६० | ६० | ६० | ६० | ६० | ६० | ६० |
| आपतकालीन व्यवस्थापन शुल्क | १० | १० | १० | १० | १० | १० | १० |
| वार्षिक नियतकालीक शुल्क | ४० | ४० | ४० | ४० | ४० | ४० | ४० |
| प्रयोगशाळा शुल्क | - | - | - | ६०० | ७०० | ८०० | - |
| महाविद्यालय विकास निधी | ७५ | ७५ | ७५ | ७५ | ७५ | ७५ | ९० |
| विद्यार्थी उपक्रम शुल्क | ४० | ४० | ४० | ४० | ४० | ४० | ५० |
| गरीब विद्यार्थी सहायता निधी | ४० | ४० | ४० | ४० | ४० | ४० | ६० |
| ग्रंथालय अनामत | १०० | - | - | १०० | - | - | १५० |
| प्रयोगशाळा अनामत | - | - | - | १५० | - | - | - |
| अश्वमेघ शुल्क | ३० | ३० | ३० | ३० | ३० | ३० | ३० |
| संगणक शुल्क | २० | २० | २० | २० | २० | २० | २० |
| विद्यार्थी समुह विमा शुल्क | १० | १० | १० | १० | १० | १० | १० |
| एम.के.सी.एल.शुल्क | ५० | ५० | ५० | ५० | ५० | ५० | - |
| स्नेह संम्मेलन शुल्क | ४० | ४० | ४० | ४० | ४० | ४० | ४० |
| ओळखपत्र शुल्क | २० | २० | २० | २० | २० | २० | २५ |
| माजी विद्यार्थी संघ शुल्क | २५ | २५ | २५ | २५ | २५ | २५ | २५ |
| व्यक्तीमत्व विकास व व्यवसाय शुल्क | २५ | २५ | २५ | २५ | २५ | २५ | २५ |
| किरकोळ शुल्क | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १५० |
| शिक्षण शुल्क | ८०० | ८०० | ८०० | २५०० | २५०० | २५०० | ५००० |
| जी. के. शुल्क | - | ५० | - | - | ५० | - | - |
| नोंदणी शुल्क | - | - | - | - | - | ० | ७५ |
| पर्यावरण शास्त्र शुल्क | १०० | - | - | १०० | - | - | - |
| पात्रता शुल्क | ५० | - | - | ५० | - | - | ५० |
| एकूण | १९१० | १६८५ | १६३५ | २६६० | २३८५ | २४३५ | ६३१० |

टिप :-१) भुगोल विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी प्रयोगशाळा शुल्क २५०/- व शिक्षण शुल्क २०००/- भरणे आवश्यक आहे.

१) FY BSc. IT/Com ट्युशन फी १५०० + लॅब फी २५००/-

२) SY BSc. IT/Com ट्युशन फी २५०० + लॅब फी ३०००/-

३) TY BSc. IT/Com ट्युशन फी ४००० + लॅब फी ४०००/-

४) FY BSc. Micro ट्युशन फी ३००० + लॅब फी ४०००/-

५) SY BSc. Micro ट्युशन फी ४५०० + लॅब फी ४५००/-

६) TY BSc. Micro ट्युशन फी ७००० + लॅब फी ५०००/-

**व विद्यापिठाने ठरवून दिलेली इतर फी विद्यार्थ्यांना भरणे आवश्यक आहे.**



## विविध शिष्यवृत्ती संबधीची माहिती :-

१) भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांनी मागास जाती व जमाती व इतर वर्गातील विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षीक उत्पन्न निर्धारीत केलेल्या मर्यादेपेक्षा कमी असेल ते विद्यार्थी शासनाच्या नियमाप्रमाणे शिष्यवृत्ती घेण्यास पात्र ठरतील अशा विद्यार्थ्यांना वरील शिष्यवृत्तीचे अर्ज कार्यालयातून मिळतील.

२) शासनाच्या विविध वसतीगृहात निवास करणाऱ्या मागास जाती - जमातीच्या विद्यार्थ्यांनी वेगळा फॉर्म भरावा.

## शिष्यवृत्तीसाठी अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावीत :-

१) शाळा सोडल्याचा दाखला (एल.सी) झेरॉक्स

२) १० व्री १२ वी गुणपत्रक झेरॉक्स

३) फोटो दोन प्रतित

४) प्रवेश पावती झेरॉक्स प्रत

५) आदेश क्रमांक जिल्हा बदल प्रमाणपत्र

६) आधारकार्ड

७) डोमेसाईल

८) वडीलांचा उत्पनांचा दाखला (मुळ प्रत)

९) २० रू. स्टॅप (एन.टी, एसबीसी, ओबीसी)

१०) जात प्रमाणपत्र छायांकीत प्रत (खाडाखोड नसलेले)

११) वडील हयात नसल्यास मृत्यृचा दाखला

१२) वडील नोकरीत असल्यास तेथील पगाराचा दाखला/ रोजगार करीत असल्यास मा. तहसिलदार यांचा दाखला (मुळप्रत)

१३) खंड असल्यास (गॅप सर्टीफिकेट)

**महाविद्यालयीन शिस्तीविषयक नियम :-**

१) महाविद्यालय विद्यार्थ्यांकडून स्वयंस्फूर्त शिस्तीची अपेक्षा करते. व्यक्तीच्या व महाविद्यालयाच्या प्रतिष्ठेस बाधक, व जबाबदार वर्तन विद्यार्थ्याने कटाक्षाने टाळावे. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या विषयाच्या तासांना वेळेवर उपस्थित रहावे.

२) आपली उपस्थिती ८० टक्के पेक्षा कमी असल्यास तसेच पुर्व परिक्षेस गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यांस विद्यापिठाच्या वार्षीक परिक्षेस बसू दिले जाणार नाही.

३) महाविद्यालयाच्या आवारात असतांना विद्यार्थ्याकडे गळ्यात ओळखपत्र असणे आवश्यक आहे. ओळखपत्राशिवाय प्रवेश करता येणार नाही. ओळखपत्रावर आपला रक्तगट, फोटो चिटकवून त्यावर प्राचार्यांची सही घ्यावी.

४) विद्यार्थ्यांनी प्राध्यापकांशी, कार्यालयात, ग्रंथालय व प्रयोगशाळेत सौजन्यपुर्णतेने व नम्रपणे वागावे.

५) तास चालू असतांना विद्यार्थ्याने महाविद्यालयाच्या आवारात फिरू नये.

६) प्राचार्यांच्या व संबधीत प्राध्यापकांच्या पुर्व परवानगीशिवाय विद्यार्थ्यांनी इतर वर्गांच्या तासांना बसू नये.

७) महाविद्यालयाच्या आवारात, वर्गात, ग्रंथालयात, मोबाईल बंद ठेवावेत

८) रॅगींग व कोणतेही कृत्य केल्यास प्रवेश रद्द केला जाईल तसेच कायदेशीर कार्यवाही केली जाईल.

९) महाविद्यालयाच्या आवारात विद्यार्थ्यास धुम्रपान व गुटखा सेवन करण्यास बंदी आहे. धुम्रपान व गुटखा सेवन करतांना सापडल्यास शासकीय नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

**महाराष्ट्र छळवाद (रॅगींग) कायदा :-**

कोणत्याही विद्यार्थ्याला गैरशिस्त वर्तनाचे प्रदर्शन करणे किंवा विद्यार्थ्यांना शारीरिक, मानसिक इजा होईल किंवा विद्यार्थ्यांस धोका, लज्जा, भय निर्माण होईल यामध्ये -

१) विद्यार्थ्याला दुखापत करणे, चिडवणे, मानहानी करणे, शिवीगाळ, दमदाटी, थट्टा मस्करी करणे.

२) विद्यार्थ्याला तो राजी नसतांना त्याच्या मनाविरूध्द एखादी कृती करावयास लावणे.

**शिक्षा :-**

शैक्षणिक संस्था/संस्थेबाहेर प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे छळवाद रॅगींग करणे, सहभाग घेणे, प्रत्यक्ष प्रोत्साहन, चिथावणी देणे, प्रचार प्रसार करणे , अशा व्यक्तीस २ वर्ष कारावास व रू १०,००० रू. दंड होऊ शकतो. ज्या विद्यार्थ्याला शिक्षा झालेली आहे त्यास महाविद्यालयातुन काढुन टाकले जाईल. सुज्ञ विद्यार्थ्यांनी यापासून परावृत्त व्हावे.



**विद्यार्थ्यांसाठी नियमावली :-**

१) महाविद्यालयात शिष्यवृत्ती घेणाऱ्या विद्यार्थ्यांची हजेरी ७५% असलीच पाहिजे.

२) विद्यार्थ्यांस एकूण अभ्यासक्रम पुर्ण करेपर्यंत शिष्यवृत्ती लागु राहिल.

३) जर विद्यार्थ्याने बी.ए. नंतर बी.एड अभ्यासक्रम पुर्ण केला असेल तर त्याने एम.ए. साठी प्रवेश घेतला तर त्यास शिष्यवृत्ती मंजूर होणार नाही.

४) विद्यार्थ्याने ज्या अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती घेतली तो अभ्यासक्रम त्याने पुर्ण केला पाहिजे जर त्याने अभ्यासक्रम अर्धवट सोडला व दुसऱ्या अभ्यासक्रमासाठी तसेच विद्याशाखा बदल करणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजुर होणार नाही.

५) विद्यार्थ्याने जर पुर्नप्रवेश घेतला तर त्यास शिष्यवृत्ती मंजूर होणार नाही.

६) विद्यार्थ्याने शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन मुदतीत भरावा. मुदतीत भरला नाही तर तो स्वत: त्यास जबाबदार राहिल.

७) विद्यार्थ्याने आपली शिष्यवृत्ती रक्कम मिळविण्यासाठी महाराष्ट्र बँक भाडणे शाखा व स्टेट बँक साक्री शाखा या राष्ट्रीय कृत बँकेतच आपले खाते उघडावे. आपल्या बचत खात्याचा क्रमांक (अकाउंट नंबर) विद्यार्थ्याने अचूक लिहावा. त्याने जर चुकीचा खाते क्रमांक दिल्यास त्याच्या खात्यावर शिष्यवृत्ती जमा न झाल्यास सर्वस्वी जबाबदारी त्या विद्यार्थ्याचीच राहिल.

**सुचना :-**

१) भारत व महाराष्ट्र शासनातर्फे विविध शिष्यवृत्त्यांचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांने चुकीची खोटी व कागदपत्रात खाडाखोड केलेल्या माहिती पुरविल्यास त्यास तो विद्यार्थी जबाबदार असेल याबाबत कायदेशीर कार्यवाही केली जाईल.

२) वरील विषयांबाबतीच्या सूचना महाविद्यालयाच्या फलकावर लावल्या जातील. दिलेल्या वेळेतच विद्यार्थ्याने अर्ज करावा. वेळेत अर्ज न केलेल्या अर्जाचा स्वीकार होणार नाही.

३) माहितीपत्रक निट वाचावे. वर्षभर ते नीट जपून ठेवावे

४) स्वत:च्या नावात, पत्यात बदल झाल्यास कार्यालयास कळवावे.












मृगाक्षी, साक्री - ९४२०९४७६५९, ९९६०३५४७१८